लोकसत्ता

WWW.LOKSATTA.COM
मंगळवार, ११ जानेवारी २०२२

वैचारिक साहित्य निर्मितीसाठी समाजही उदार लागतो!

न्या. नरेंद्र चपळगावकर यांचे मत

सुहास सरदेशमुख, लोकसत्ता,
औरंगाबाद

वैचारिक साहित्य निर्मितीसाठी समाजही उदार मनाचा लागतो. तसेच निर्भय लिहिण्याचे वातावरण निर्माण व्हायला हवे असे प्रतिपादन माजी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांनी व्यक्त केले. साहित्याच्या क्षेत्रात भरीव योगदान देणारे माजी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांना महाराष्ट्र फाऊंडेशनच्या वतीने दिला जाणारा जीवनगौरव पुरस्कार सोमवारी जाहीर करण्यात आला. मे. पुं. रेगे यांनाही हा सन्मान मिळाला होता. तोच सन्मान मिळाल्याचा आनंद असल्याचे न्या. नरेंद्र चपळगावकर यांनी सांगितले. त्यांच्या लिखाणाविषयी व साहित्य प्रेरणांबाबत त्यांच्याशी साधलेला संवाद...!

नरेंद्र चपळगावकरांची साहित्य संपदा

अन्न मेसल कायदा, लॉ ऑफ इलेक्शन इन इंडिया, भारतीय संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, निवडणुकीचा कायदा, कर्मयोगी संन्यासी, राज्यघटनेचे अर्धशतक, तुडवा माडवा मनातले, कायदा आणि माणूस, समाज आणि संस्कृती, मराठवाडा साहित्य संमेलनाची अध्यक्षीय भाषणे, विधिमंडळे आणि न्यायसंस्था संघर्षाचे सहजीवन, तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ, न्या. कारीनाथ रंबक तेलंग, सावलीचा शोध, वैपमाला, महाराष्ट्राचे शिल्पकार: अनंत भालेराव, पत्रकारिता: कायदे आणि नीतीमूल्ये, महात्मा गांधी व भारतीय राज्यघटना, मनातील माणसं, न्या. केशवराव कोरटकर, कहाणी हैदराबाद लढ्याची, त्यांना समजून घेताना, लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी नेतृत्वाची साथेजोड, संघर्ष आणि सत्याग्रह, नामदार गोखल्यांचा भारत सेवक समाज अशी ३१ पुस्तके प्रकाशित आहेत.

■ लिखाणाच्या प्रेरणा कोणत्या आणि लिहिण्याच्या प्रवासाविषयी काय सांगाल?

नरेंद्र चपळगावकर : खरे तर लिहावं वाटले तेव्हा ललित वाङ्मयापासूनच सुरुवात झाली. अगदी सुरुवातीच्या काळात काही कविताही लिहिल्या. पण वडील सक्रिय राजकारणात होते. त्यामुळे घरात सर्वसामान्य माणसाचे प्रश्न, त्याच्या सोडवणुकीच्या चर्चा सुरू असत. ते समजून घेऊन मांडायला हवेत असे सातत्याने वाटत. त्यामुळे ललित, कविता वगैरे असे लिखाण मागे पडत गेले. त्यामागे सर्वसामान्य माणसांचे प्रश्न मांडणे हीच प्रेरणा होती. निर्भयपणा हा शब्द जरा मोठा होईल पण लोकांच्या हिताचं कोणाला आवडो की न आवडो हे सांगत रहावे असे वाटत गेले आणि जरासे वैचारिक लिखाण करता आले.

■ राजकीय म्हणजे कशा प्रकारचे लिखाण?

राजकीय फायद्याचं असेल अशाच बाबींची चर्चा घडवून आणली जाते. पण हैदराबाद संस्थानाच्या मुक्ती संग्रामाचा लढा त्यातील व्यक्ती, त्यांच्या लढण्याच्या प्रेरणा याची माहिती मराठवाड्याबाहेर कोणाला नव्हती. त्यामुळे त्या लढ्यातील नेते, चळवळी घडवून आणणारी माणसे यांच्याविषयी लिहावे असे वाटत गेले. खरे तर अलीकडे आता इतिहास सोयीने लिहिला जातो. पण हैदराबाद मुक्ती लढ्यात उतरणाऱ्या व्यक्ती या कनिष्ठ मध्यमवर्गीय होत्या. गरीब कुटुंबातील होत्या. त्यांच्यामध्ये त्यागाची भावना होती. ती भावना अधोरेखित व्हावी हा लिखाणाच मूळ उद्देश. त्यामुळे १९ व्या शतकातील सुधारणांच्या प्रेरणांचा प्रवास म्हणून 'तीन न्यायमूर्ती' पुस्तक लिहिले गेले.

■ ख्रिस्ती मिशनरींविषयीही तुम्ही लिहिले आहे, त्याविषयी काही ...

खरे तर धर्म हा माणसाला मार्गदर्शन करणारा एकमेव घटक आहे असे मी मानत नाही. साधारण दोन हजार मैलावरून येणारी या खस्ती धर्मप्रसारकांचे येथील जगणे फार तर सरासरी पाच वर्षे एवढेच होते. तेव्हा वेगवेगळ्या साथरोगाने ते आजारी पडत. त्यातील अनेकांचे मृत्यूही झाले. त्यांच्या कामाच्या प्रेरणा धर्म प्रसाराच्या असतीलही पण त्यांची खडतर परिस्थितीमध्ये काम करण्याच्या निष्ठेविषयीच्या कुतुहलातून त्यांच्याविषयी लिहिले गेले.

■ नाशिक येथील अ. भा. साहित्य संमेलनात तुम्ही व्यक्त होण्यातील निर्भयतेविषयी मत प्रदर्शित केले होते...

हे मत काही पहिल्यांदा व्यक्त केले असे नाही. यापूर्वीही काही भाषणांमध्ये विचार करणारा वर्ग निर्भय असायलाच हवा. तो लाचार झाला की सारेच बिघडते. साहित्यिकांनी, पत्रकारांनी तसेच रहायला हवे. एकदा तुम्ही उपकारच्या ओझ्याखाली दबले गेले की समाजातील प्रेरणा संपतात. १९२० च्या सुमारास गांधी विचारांच्या प्रचारासाठी आचार्य जावडेकर, आचार्य भागवत यांनी घेतलेली भूमिका नेहमी पटणारी आहे. सामाजिक प्रश्नाची चर्चा विद्यापीठातून होत नाही असे कळाल्यानंतर त्यांनी ती तशी सुरू ठेवण्यासाठी प्रयत्न केले. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य मिळविणे ही प्रेरणा होती. त्यातून त्याग, सत्याग्रह ही मूल्ये समाजात रुजत गेली. तेव्हाही सर्व समाज लढ्यात होता असे नाही. पण अशा प्रकारचे प्रयत्न करणाऱ्याविषयी त्यांच्या मनात सहानुभूती होती. त्यानंतर अशी प्रेरणा निर्माण करण्यात आपण सारे कमी पडलो. खरे तर नेहरु जेव्हा साहित्य अकादमीचे अध्यक्ष होते तेव्हा सरकारकडून होणाऱ्या चुका दाखवा असे आवाहन त्यांनी साहित्यिकांना केले होते. आता साहित्य संमेलनेच अनुदानातून सुरू आहेत. खरे तर अशा अनुदानाच्या रकमा न स्वीकारता संमेलने झाली तरी निर्भयपणे व्यक्त होण्याच्या प्रक्रियेला गती मिळेल. असेच मत दुर्गाबाई भागवतांनी मांडलेले होते. सत्ता आणि सत्ताधाऱ्यांपासून दूर राहायला हवे.

■ आताशा साहित्यिकही भूमिका घेताना दिसत नाहीत?

कोणत्या प्रश्नी भूमिका घ्यावी यावर मतभिन्नता असू शकतात. पण जेव्हा एखादा लेखक लिहिताना भीती वाटते, असे म्हणत असेल तर साहित्यिकांनी जरूर भूमिका घ्यावी. एरवी उगाच सवंग लोकप्रियतेसाठी प्रतिक्रिया व्यक्त करणेही चूकच ठरेल.

■ अलिकडे वैचारिक साहित्यही कमी झाले आहे का, आणि असे का घडते?

हो हे खरे आहे की वैचारिक साहित्य तसे कमी प्रकाशित होत आहे. पण असे साहित्य निर्माण व्हावे असे वाटत असेल तर समाजातील उदारता हाही महत्वाचा निकष मानावा लागेल. समाजातील उदारपणा संपला की विचारी माणूस लिहायचे थांबवतो. वैचारिक लिखाण करणाऱ्या विषयी समाजातही आपुलकी लागते. आचार्य भागवतांच्या काळातील समाजाला मान्य होते की, हा माणूस ऋषीतुल्य आहे. वैचारिक भूमिकांची गरज आहे असे समाजालाही वाटायला हवे. आजही आवाजा उंचावणारे लोक आहेत. पण ते संघटीत नाहीत. त्यामुळे चर्चा, विचार नकोसे वाटतात असे वातावरण आहे. स्वार्थ आला की निर्भयपणा संपतो त्याचे प्रतिबिंब वैचारिक साहित्य कमी होण्यातही दिसते.

Scanned with CamScanner